# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## क क्षेत्रीय कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक-८
## सभावृत्तांत

दि.- ०७/१०/२०१५ वेळ –दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्याक प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०७/१०/२०१५ रोजी दुपारी ३:०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**
२) मा.भोसले राहूल हनुमंतराव
३) मा.पालांडे सुजाता सुनिल
४) मा.सौ.पानसरे अमिना महंमद
५) मा.शितोळे शैलजा बाबुराव
६) मा.प्रशांत शितोळे
७) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
८) मा.संजय केशवराव काटे
९) मा.सतिश सदाशिव काटे स्वीकृत सदस्य
१०)मा.गणेश आनंदराव ढोरे ------“--------
११)मा.हमीद नवाब शेख ------“--------

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.शिंदे-उपअभियंता स्थापत्य, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.पुजारी-उपअभियंता (झोनिपू), श्री.क्षिरसागर-कनिष्ठ अभियंता स्थापत्य,मा.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी,मा.उगले-लेखाधिकारी, हे अधिकारी उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१) प्रभाग क्र.६३ कासारवाडी येथील कै.मामासाहेब पिंपळे उदयानात समाजमंदीर बांधण्याबाबत-मा.किरण मोटे, मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) दापोडी येथील नव्यानेच विकसीत झालेल्या “आई” उदयानामध्ये अधुनिक पध्दतीचे ओपन जिम (खुली स्वरुपाची व्यायामशाळा) उभारणेबाबत- मा.राजेंद्र काटे, मा.किरण मोटे, यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) प्रभाग क्र.६२ दापोडी येथील गणेशनगर भागातील माता शितळादेवी चौक ते सुंदरबाग चौक तसेच पिंपळेगुरव पुल ते माता शितळादेवी चौक रस्त्याच्या दुर्तफा पावसाळी गटर्सवर कॉक्रीट स्लॅब् टाकणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९९९९९९/- (अक्षरी रुपये नऊ लाख नव्यान्नव फक्त) च्या प्रशासकीय खर्चास मान्यता मिळणेबाबत- मा.राजेंद्र काटे, मा.किरण मोटे, यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) प्रभाग क्र.६४ बोपखेल स्मशानभुमीजवळील मोडकळीस आलेल्या एफ.आर.पी. मुता-या शौचालय हटविणेबाबत- मा.संजय काटे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) तरतुद वर्ग करणेबाबत- मा.प्रशांत शितोळे,मा.एकनाथ मोटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) अंदाजपत्रकीय तरतुदीचा उल्लेख होणेबाबत-मा.प्रशांत शितोळे व मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-७) सांगवी प्र.क्र.६० मध्ये संगमनगर परिसरातील रस्ते विकसित कामाचे माहितीफलक सदस्यांचे नावांसह लावणेबाबत- मा.प्रशांत शितोळे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ८) पुतळा स्थलांतरीत करणेबाबत- मा.प्रशांत शितोळे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक- ९) सांगवी गावठाण येथील टॉयलेट बॉक्स काढून टाकणेबाबत- मा.प्रशांत शितोळे,मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-१०) सांगवी प्र.क्र.६० मधील जुने शौचालय पाडून नवीन बांधणेबाबत-मा.प्रशांत शितोळे,मा.किरण मोटे,मा.संजय काटे यांचा प्रस्ताव.

--------

दि.०२/९/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक- १३८ विषय क्रमांक- १
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.किरण मोटे अनुमोदक- मा.राजेंद्र काटे
संदर्भ- मा.किरण मोटे,मा.राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६३ कासारवाडी येथील मनपाच्या नियमानुसार कै.मामासाहेब पिंपळे उदयानामध्ये ५ गुंठे जागेत समाजमंदीर बांधणेस परवानगी तसेच येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------

ठराव क्रमांक- १३९ विषय क्रमांक- २
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.राजेंद्र काटे अनुमोदक- मा.किरण मोटे
संदर्भ- मा.राजेंद्र काटे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दापोडी येथील सर्व्हे नं२७ गणेशनगर या भागामध्ये पिं.चिं.मनपा मार्फत जवळपास दीड कोटी रुपये खर्च करुन नव्यानेच “आई” उदयान हे विकसित करणेत आलेले आहे. “आई” उदयानात दररोज सकाळी तसेच सायंकाळच्या वेळेत ज्येष्ठ नागरिक,महिला तसेच तरुण वर्ग हे मोठया प्रमाणात फिरायला येत असतात.

दापोडी तसेच आसपासच्या परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्या हिताच्या दृष्टीने विचार करता तसेच किशोरवयीन मुले,तरुण व प्रौढ वर्ग यांच्या मागणीनुसार “आई” उदयानात आधुनिक पध्दतीचे ओपन जिम ( खुली स्वरुपाची व्यायामशाळा) उभारण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------

ठराव क्रमांक- १४० विषय क्रमांक- ३
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.राजेंद्र काटे अनुमोदक- मा.किरण मोटे
संदर्भ- मा.राजेंद्र काटे, मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६२ दापोडी येथील गणेशनगर या भागातील शितळादेवी चौक ते सुंदरबाग चौक तसेच पिंपळेगुरव पुल ते माता शितळादेवी चौक रस्त्याच्या दुर्तेफा पावसाळी गटर्सच्या वरील झाकणे हे जुनाट,खराब अवस्था झाल्याने तसेच काही ठिकाणी गटर्सवर झाकणे नसल्याने नागरिक विशेषत: जेष्ठ नागरिक,महिला वर्ग,विदयार्थी वर्ग खड्डयात पडून जीवीतहानी होण्याची दाट संभावना आहे.

तरी सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करता प्रभाग क्र.६२ दापोडी येथील गणेशनगर भागामध्ये वरीलप्रमाणे ठिकाणी कॉंक्रीट स्लॅब टाकणेकरिता अंदाजपत्रकीय र.रु.९,९९,९९९/- (अक्षरी रुपये नऊ लाख नव्यान्नव फक्त) च्या होणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १४१ विषय क्रमांक- ४
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.संजय काटे अनुमोदक- मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.संजय काटे, मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६४ मधील बोपखेल स्मशानभूमीजवळ मोडकळीस आलेल्या एफ.आर.पी.मुता-या शौचालय आहेत स्मशानभुमीजवळ दुमजली शौचालय व मुतारी असल्याने एफ.आर.पी.मुता-या शौचालयांची आवश्यकता नसल्याने सदर एफ.आर.पी.मुता-या शौचालय काढून टाकण्याची कार्यवाही व्हावी तसेच दापोडी येथे पालखी विसावा समोरच पुणे-मुंबई महामार्गालगत पडीक मुतारी आहे.

तरी सदर मुता-या काढून टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १४२ विषय क्रमांक- ५
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.संजय काटे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे, मा. संजय काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपा अंदाजपत्रक २०१४-१५ मध्ये सांगवी येथील वेताळ महाराज मंदीर परिसरातील आजुबाजुचे दुरुस्तीविषयक कामे करणे या कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु.५ लक्ष इतकी असुन सदर कामाकरिता र.रु.२५ लक्ष इतकी अंदाजपत्रकीय रकमेची तरतुद उल्लेख व्हावा व याकरिता नव्याने लेखाशिर्ष तयार करुन त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी व सदर प्रस्ताव कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मान्यतेकामी पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १४३ विषय क्रमांक-६
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.किरण मोटे
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे , मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

सांगवी प्र.क्र.६० मधील स.नं.६ येथे “शिवसृष्टी” हे उदयानात छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनातील विविध प्रसंग दर्शविणेत आले आहेत सदर उदयानात छ.शिवाजी महाराजांचे जीवनावरील आणखी प्रसंग याठिकाणी करणेत यावीत यासाठी नव्याने काम करणे आवश्यक आहे.

सदर उदयानात काम करणेसाठी स्थापत्य-उदयान विभाग अंदाजपत्रकात नवीन कामाचा समावेश करुन नवीन लेखाशिर्ष निर्माण करुन सांगवी येथील शिवसृष्टी उदयानात उर्वरित कामे करणे असे लेखाशिर्ष नव्याने तयार करुन सदर कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु.२ कोटी व आवश्यक तरतुद र.रु.१ लाख करणे आवश्यक आहे.तरी चालू अंदाजपत्रकात वरीलप्रमाणे नव्याने लेखाशिर्ष तयार करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १४४ विषय क्रमांक- ७
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे , मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

सांगवी प्र.क्र.६० मधील संगमनगर परिसरातील रस्ते विकसित करणेचे काम चालू असून सदर कामांबाबतचे माहितीफलक सदस्यांचे नावांसह विविध ठिकाणी लावणेकामी तसेच या प्रभागामध्ये झालेले इतर कामांबाबतही योग्य ठिकाणी सदर प्रकारचे काम घेणेकामी मान्यता देणेत येत आहे.सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १४५ विषय क्रमांक- ८
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे , मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

मनपा हद्दीतील सांगवी येथे प्र.क्र.६० मध्ये सर्वे क्र.५ मध्ये स्व.वसंतदादा पाटील (माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य ) यांचा पुतळा असुन सदर पुतळा बाजुला योग्य ठिकाणी स्थलांतरीत करणेत यावा.जेणेकरुन रहदारीस व वाहतुकीस तसा सर्वांना अडथळा होणार नाही अशा ठिकाणी स्थलांतरीत करणेस मान्यता देणेत येत आहे.सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १४६ विषय क्रमांक- ९
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे , मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

सांगवी गावठाण येथील आरोग्य विभागाचे लेखी अहवालानुसार प्र.क्र.५९ व ६० मधील नागरिकांना उपयुक्त नसणारे व वापर नसणारे टॉयलेट ब्लॉक्स काढून टाकणेकामी मान्यता देणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्रमांक- १४७ विषय क्रमांक- १०
दिनांक- ७/१०/२०१५ विभाग-
सुचक- मा.प्रशांत शितोळे अनुमोदक- मा.राहूल भोसले
संदर्भ- मा.प्रशांत शितोळे , मा.राहूल भोसले यांचा प्रस्ताव.

सांगवी प्र.क्र.६० मध्ये चंद्रमणीनगर येथील जुने शौचालय पाडून नवीन बांधणे व कुंभारवाडा येथील जुने शौचालय पाडून नवीन बांधणे या दोन कामांचे आदेश निर्गत केले आहेत.


सदर काम पुररेषेत असल्याने शौचालय न पाडता सदर कामाचे नुतनीकरण करुन शौचालयाची दुरुस्ती करणेत यावी व त्याप्रमाणे कामाचे स्वरुपात बदल होणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(मोटे किरण बाळासाहेब )
सभापती क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६



जा.क्र.कक्षेका/कावि/ १४९/२०१५
दिनांक- १५/१०/२०१५

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा) क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.